REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# चाणक्यकालीन करनिती

तेजस्विनी बाजीराव मुडेकर
सहयोगी प्राध्यापिका व अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कमला कॉलेज, कोल्हापूर.

## प्रास्ताविक :




आज भारतात वस्तू व सेवा कर कायदा लागू झाला आहे. जगातील १६० देशांमध्ये ही 'एक देश एक कर प्रणाली' सुरू आहे. या करपद्धतीमुळे अप्रत्यक्ष करांची संख्या कमी होऊन एक कर, एक राष्ट्र व एक बाजारपेठ अशी आदर्शवत रचना होऊ पहात आहे. या कर प्रणालीत अधिक पारदर्शीपणा असून कर बुडवेगिरीला निश्चितच प्रतिबंध होऊ शकेल असा आशावाद वर्तविला जात आहे. केंद्रीय, राज्य व एकात्मिक वस्तू व सेवाकरांचा महसूलही समाधानकारक आहे. ही झाली भारतातील सद्य: परिस्थितीतील करपद्धती परंतु भारतातील करव्यवस्थेचा मागोवा घेतला असता तिची मुळे महाभारतात सापडतात. सदर शोधनिबंधात आर्य चाणक्यकालीन करनितीचा अभ्यास केला आहे.

## शोधनिबंधाची उद्दिष्टे :

१. चाणक्यपूर्व करव्यवस्थेचा ऐतिहासिक आढावा घेणे.
२. आर्य चाणक्यकालीन करनिती अभ्यासणे.
३. आर्य चाणक्यकालीन करनितीची सद्य:स्थितीत उपयुक्तता अभ्यासणे.

## अभ्यासपद्धती :

सदर शोधनिबंध दुय्यम सामग्रीवर आधारित आहे. विश्लेषणातील संदर्भग्रंथ, मासिके आणि संकेतस्थळांचा आधार घेण्यात आला आहे.

## चाणक्यपूर्वकालीन कर व्यवस्थेचा ऐतिहासिक आढावा :

महाभारतात राजधर्मपर्वात करांविषयी उल्लेख आढळतो. त्यात म्हटले आहे, ''अराजक राष्ट्रात मोठे मासे लहान माशास खाणे सुरू होते.'' यातून बाहेर पडण्यासाठी प्रजाजनांचा एक करार झाला. पण तो करार फार काळ टिकला नाही. म्हणून सर्व लोकांनी वैवस्वतमनूस शेतीच्या उत्पन्नाच्या १/६ भाग आणि व्यापारातील नफ्याच्या १/१० भाग रोख देण्याचा करार करून त्याला राजा केले. राजाने प्रजेचा योगक्षेम चालवावा आणि त्याकरिता प्रजेने कर द्यावा असा हा करार होता.

महाभारतात भिष्म युधिष्ठिराला करव्यवस्था कशी असावी याचे मार्गदर्शन करताना म्हणतात, ''राजाने योग्यवेळी प्रजेकडून संपत्तीचे संकलन करावे. ज्याप्रमाणे व्यक्ती आपल्या गाईचे दूध दररोज संकलित करतो. त्याप्रमाणे राजाने आपल्या साम्राज्यामधून संपत्ती संकलित करावी.''

कालिदासाने रघुवंशमध्ये राजा दलिप याच्या करव्यवस्थेची स्तुती करताना म्हटले आहे, ''ज्याप्रमाणे सूर्य पृथ्वीची आर्द्रता शोषून घेतो व हजारो पटीने पृथ्वीला परत करतो. त्याप्रमाणे हे राजा तू आपल्या प्रजेकडून अत्यंत उत्कृष्टप्रकारे कर संकलन करीत आहेस.''

मनुस्मृतीमध्येही राजाने कर घ्यावा असा उल्लेख आहे. ''कराचा संबंध उत्पन्न व खर्चाशी असावा. राजाने करविरहित व्यवस्था व कराचा अतिरेक टाळावा. प्रजेला

कळणार नाही अशा पद्धतीने राजाने कर संकलित करावा. व्यापारी व कारागिरांनी नफ्याच्या १/५ भाग कररूपाने द्यावा. शेतकऱ्यांनी परिस्थितीनुसार त्यांच्या उत्पादनातील १/६, १/८, १/१० भाग कररूपाने द्यावा. नट, नृत्यांगना, गायक या सर्व कलाकरांनीही कर द्यावा. सुवर्णमुद्रा, गुरे, धान्य, कच्चा माल तसेच वैयक्तिक सेवा या रूपानेही कर जमा करावा.''

### चाणक्यकालीन करनिती :

करविषयक विचारांची सविस्तर मांडणी ख्रिस्तपूर्व तिसऱ्या-चौथ्या शतकात म्हणजेच सम्राट चंद्रगुप्त मौर्याच्या काळात 'कौटिलीय अर्थशास्त्र' या ग्रंथात कौटिल्य/चाणक्याने केली आहे. कौटिलीय अर्थशास्त्रात महसूल मिळविण्याच्या मार्गांचा तपशीलवार विचार केला आहे. 'प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां चहिते हितम्' प्रजासुख हेच राजाचे सुख प्रजाहित हेच राजाचे हित अशी चाणक्याची धारणा होती. तसेच राज्याचा कारभार हा करवसूलीवर चालतो असे त्याचे मत होते.

राज्यकारभार नियोजनबद्ध होण्यासाठी त्याने वेगवेगळ्या खात्याची निर्मिती केली असून त्यासाठी मंत्रीही नियुक्त केले जावेत. कौटिलीय अर्थशास्त्रातील २७, ४२, ४३, ५६ या अध्यायांमधून राज्याचा महसूल व तत्कालीन करपद्धती याविषयी चाणक्याने विस्ताराने विवेचन केले आहे.

समहर्त्याने (फडणीस) राज्याच्या उत्पन्नाच्या बाबींवर देखरेख ठेवावयाची असते. तो कर वसुलीची रक्कमही ठरवित असे. त्याने दुर्ग, राष्ट्र, खाणी, सेतू, वने, गौळीवाडे व व्यापाराचे मार्ग यावर देखरेख ठेवून योग्य प्रकारे कर संकलित केले पाहिजे. दुर्ग, किल्ले, शहर या विभागामध्ये जकात, वजने-मापे, दंड, सीमा तपासणारा, मद्यपानगृहे, कत्तलखाने, कोळी, तेल, तूप, मीठ, सोने विकणारे, मंडई, वेश्यागृहे, जुगाराचे अड्डे, कारागीर, देवाचे पुजारी यांचा समावेश होतो. राष्ट्र या शब्दामध्ये शेतीचे उत्पन्न, शेतसारा, यात्रेकरूंवरील कर, रोखीमध्ये घेतलेला कर, व्यापारी तीर्थरक्षकांकडून घेतलेला कर इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. खाणी या शब्दामध्ये बहुतांशी खाणीत व समुद्रात सापडणाऱ्या गोष्टींचा समावेश केला आहे. उदाहरणार्थ सोने, रूपे, हिरे, मोती, पोवळे, शंख, लोह, सैंधव, शिला, पारा व धातू इत्यादी. सेतू या शब्दामध्ये फुले, फळे, पानमळे, भाताचे वाफे यांचा अंतर्भाव होतो. वन या शब्दात पशू, मृग, इमारतींची लाकडे, हत्ती व त्यापासून मिळणारा महसूल याचा समावेश होतो तर गौळीवाडे या शब्दात गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या, गाढवे, उंट, घोडे, खेचरे यासारख्या प्राण्यांचा समावेश होतो. योग्य मार्गाने अधिकाधिक महसूली उत्पन्न कसे जमा होईल हे पहाण्याची जबाबदारी समहर्त्याची किंवा फडणीसाची असे. हा महसूल राजाला वेगवेगळ्या करांमधून, उत्पन्नातून, दंड व फीद्वारे मिळत असे.

शेतीची व्यवस्था नीट ठेवण्यासाठी व करवसुलीसाठी 'सीमाध्यक्ष' नेमावा. व्यापार, उदीम सरकारच्या नियंत्रणाखाली असावा व त्यासाठी 'पणाध्यक्षाची' नेमणूक करावी. जकातीचे व्यवहार बघण्यासाठी 'शुल्काध्यक्ष' नेमावा. पट्टी व कररूपाने सरकारने महसूल जमा करावा. जकात, वजनेमापे वापरण्याबद्दल कर, कत्तलखान्याचा आकार, धंद्याच्या प्राप्तीवरील कर, वेश्यागृहे व जुगाराचे अड्डे याच्यावरील कर, शेतसारा, यात्रेकरूंवरील कर, तीर्थांवरील कर, गायरानाचा आकार, कोंडवाडा पट्टी, पाणीपट्टी त्याला उदक भाग असे म्हणत. करमणूक कर इत्यादी. इतर करांपेक्षा जकातीविषयी अधिक माहिती कौटिल्याच्या अर्थशास्त्रातील बेचाळिसाव्या व त्रेचाळीसाव्या आध्यायात आढळते.

### जकात कर :

मौर्यकाळात व्यापारावरही कर आकारला जात असे. चाणक्य म्हणतो शहराच्या मोठ्या वेशीजवळ जकात नाके बसवावे. जकात वसूल करण्यासाठी चार-पाच कारकून नेमावे त्या कारकुनांनी जे व्यापारी माल घेऊन येतील ते कोण, कुठले, त्यांच्या जवळील माल कोणत्या प्रकारचा आहे, याची चौकशी करून त्याची नोंद ठेवावी. व्यापाऱ्याने जकात नाक्यावर माल आणून ठेवल्यावर माल किती आहे व त्याची किंमत काय, हे ओरडून सांगावे. तीनवेळा किंमत पुकारल्यावर शेवटी जो लिलाव पुकारेल त्यास तो द्यावा. अधिक गिऱ्हाईक असल्यास मालाची किंमत वाढते. त्याप्रकारे किंमत वाढल्यास किंमतीतील वाढ व जकात यांचा सरकारी तिजोरीत भरणा करावा. परदेशातून आपल्या देशात येणारा माल व आपल्या देशातून परदेशात जाणारा माल यावर जकाती आकाराव्यात.

परदेशातून येणाऱ्या मालाने प्रजेचे कल्याण होत असेल तर असा माल जकातीत सवलती देऊन आणावा. परदेशी मालावर, मालाच्या किंमतीच्या १/५ जकात आकारावी. फळे, फुले, भाजीपाला, धान्य, परदेशातून येणारी रत्ने यावर जकात आकारताना त्या जिनसा तयार करण्यास श्रम किती पडतात, कालावधी किती लागतो, मजूरी किती द्यावी लागते याविषयी माहिती असणाऱ्या तज्ञास विचारून जकात आकारावी.

जाडे, तलम, रेशमी वस्त्र, सुती कापड, धातू, रंग, चंदन, अंगात घालावयाची वस्त्रे, हस्तिदंत, मद्य, चामडी, सतरंज्या, कांबळी, लोकर यावर १/१० किंवा १/१५ जकात आकारली जाई.

जनावरे, कापूस, औषध, सुगंधी माल, लाकूड, वेळू, मातीची भांडी, तेल-तूप, गूळ, साखर, मीठ इत्यादींवर १/२० किंवा १/२५ जकात द्यावी लागे.

### गैर मार्गासाठी दंड आकारणी :

व्यापाऱ्यांनी आपला माल जकात चुकवून नेऊ नये किंवा राजाची फसवणूक करू नये यासाठी राजाकडून काही उपाय योजले जात. राजाचे काही हेर व्यापाऱ्याचा वेष धारण करून व्यापाऱ्यांमध्येच मिसळत असत व इतर व्यापाऱ्यांच्या मालाची सर्व माहिती मिळवून तो राजाला कळवित असत. ज्या हेराकडून राजाला माहिती मिळाली आहे त्याच हेरामार्फत जकात अधिकाऱ्यापर्यंत ती माहिती पोहोचविली जात असे. यामध्ये राजाचे दोन हेतू असत. एक म्हणजे त्या जकात नाक्यावरील सर्व माहिती राजाला कळत आहे हे समजल्यामुळे त्या जकात अधिकाऱ्यावरही वचक रहात असे व दुसरे व्यापाऱ्यांवरही वचक राहून योग्य पद्धतीने कर संकलन होत असे. म्हणजेच कर चुकवेगिरी, भ्रष्टाचार याला आळा घालण्याचा हा प्रयत्न असे. ज्या मालावर शिक्का नसेल त्याबद्दल दुप्पट दंड आकारावा. खोटा शिक्का मारल्यास आठपट दंड द्यावा. शिक्का बदलल्यास किंवा दुसऱ्याचा माल आपला आहे असे सांगितल्यास त्या व्यापाऱ्याला बंदी करावे व प्रत्येक मालाच्या गठ्ठ्याबद्दल सव्वा 'पण' (त्या काळातील चलन) दंड करावा. व्यापारी लोक संघ करून मालाच्या किंमती भरमसाठ वाढवू लागले तर त्यांना दंड आकारला जाई. चाणक्य एकावेळी व्यापारास प्रोत्साहनही देतो तर दुसऱ्या बाजूने नफेखोरीविरोधी उपायही सुचवितो.

### कर चुकवेगिरीबद्दल दंड :

त्या काळीही कर चुकवेगिरी केली जात होती. त्यासाठी काही दंड आकारणी केली जात असे. जकात चुकविण्यासाठी जर कुणी मालाची किंमत कमी सांगितली किंवा वजन कमी सांगितले तर आठपट दंड करावा किंवा राजाने तो माल आपल्या ताब्यात घ्यावा. कमी प्रतीचा माल दाखवून अधिक चांगल्या प्रतीचा माल लपविला तर आठपट दंड करावा. निशाण ओलांडून जकात न देता व्यापारी जात असेल तर आठपट दंड करावा. जकात भरलेल्या मालात जकात न भरलेला माल लपवून नेला जात असेल किंवा एका मालाचा परवाना दाखवून दुसराच माल नेला जात असेल तर त्या मालाची किंमत आणि तितकाच दंड वसूल करावा. जो माल न्यायला अथवा आणायला बंदी आहे असा माल उदा.हत्यारे, चिलखते, रत्ने इत्यादी असा कोणताही माल घेऊन जाणाऱ्यास त्यावर जितका दंड पुकारला आहे तितका दंड करून तो माल जप्त करावा. दुसऱ्या देशातून जे व्यापारी आले असतील त्यांचा माल तपासून वेगवेगळ्या प्रतीच्या मालावर वेगवेगळे शिक्के मारावे व नंतर तो माल जकात अधिकाऱ्याकडे पाठवावा. जकातीचा मुख्य अधिकारी लपवा-छपवी करीत असेल तर त्यासही दंड केला जात असे.

**जकात माफी :**

न्याय्य तत्त्वाचा विचार करून काही माल हा जकातीतून वगळला जात असे. देवकार्य, यज्ञ, लग्न, मुंज, जाऊळ, गोप्रदान, व्रत, उद्यापन, बाळंतिणीकरिता आणलेला माल, नजराण्यासाठी आणलेला माल, विवाहीत स्त्रीने वडिलांच्या घरातून पतिगृही नेण्यासाठी आणलेला माल यावर जकात आकारली जात नसे.

**शेतसारा/तगाई :**

शेती हे शेतकऱ्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते, आणि सरकारच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत शेतसारा हाच होता. लागवडी योग्य सर्व जमिनीवर उत्पन्नाच्या मानाने १/२० ते १/३ पर्यंत शेतसारा वसूल केला जात असे. सार्वजनिक विहिरी, नदी, सरोवरे, तळी यांचा वापर केल्यास १/४ पाणीपट्टी द्यावी लागत असे. वसुलीचा १/२ भाग रोख व १/२ भाग वस्तूरूपाने घेतला जात असे. राजाने शेतकऱ्यावर पित्याप्रमाणे प्रेम करावे. कर वसुली करताना ती जुलमाने करू नये. उत्पन्न येवो अथवा न येवो सरकार दप्तरी कर भरलाच पाहिजे अशी सक्ती नसे.

**इतर कर व फी आकारणी :**

सरकार विविध प्रकारचे कर व फी गोळा करीत असे. कराद्वारे मिळणाऱ्या उत्पन्नातून प्रशासकीय खर्च भागविला जात असे, तसेच राज्यात विविध प्रकारच्या सुधारणा केल्या जात असत. राज्यात कोणकोणते कर घेतले जावेत याविषयी चाणक्य यांनी आपल्या ग्रंथात मार्गदर्शन केले आहे. त्यापैकी काही कर पुढीलप्रमाणे -

१. परदेशातून येणाऱ्या मिठावर किंमतीच्या १/६ कर आकारावा.
२. मासे पकडणाऱ्या कोळ्यांनी उत्पन्नाच्या १/६ कर द्यावा.
३. बंदरातील व्यापाऱ्यांनी १/५ किंवा १/६ जकात द्यावी.
४. गणिका/वेश्येने महिन्यातून २ दिवसांचे उत्पन्न सरकारला कर रूपाने द्यावे.
५. जनावरांच्या विक्रीवर विक्री किंमतीच्या पावपट कर द्यावा.
६. वजने, मापे यांची परीक्षा करून त्यावर शिक्के मारण्याबद्दल चार माष (त्या काळातील चलन) फी आकारावी.
७. वजनमापांची तपासणी फी १ काकणी (त्या काळातील चलन) द्यावी.
८. परवाना फी - देशातून परदेशात जाताना व परदेशातून स्वदेशात येताना दर माणसी १ माष परवाना फी द्यावी.
९. गायरानात जनावरे चारण्याबद्दल फी द्यावी.
१०. गैरवर्तन, चोरी, गैरव्यवहार, फसवणूक, अपराध याबद्दल जो दंड केला जात असे तो सरकारी खजिन्यात जमा होई.

कौटिल्याच्या म्हणण्याप्रमाणे किंमतीच्या १६ टक्के करदर हा पर्याप्त आहे.

**सद्य:स्थितीत उपयुक्तता :**

आज सरकारने वस्तू व सेवा कर पद्धती स्वीकारली आहे. संपूर्ण देशासाठी एक कर पद्धती लागू केली आहे. संपूर्ण देशासाठी एक कर पद्धती लागू करताना चाणक्यकालीन करनितीप्रमाणे अधिकाधिक वस्तू व सेवा करक्षेत्रात कशा समाविष्ठ होतील याचा विचार केला आहे. कर पाया हा सर्वंकष करण्याचा प्रयत्न केला आहे. चाणक्य करनितीत ज्या न्यायाचा विचार करून काही बाबींना करकक्षेतून वगळले होते त्याचप्रमाणे आजही सर्वसामान्यांकडून वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर अत्यंत कमी दराने कर आकारणी करण्यात आली आहे. एकंदरीत त्याकाळी जे मुख्य व्यवसाय होते त्यावर कर लावले होते. शेती, व्यापार, पशुपालन इत्यादी व्यवसायांवर कर आकारणी केली जात होती. आजही नवनिर्मित सर्व व्यवसाय करकक्षेत आणले असून त्या काळाप्रमाणेच कर चुकवेगिरीस दंड व शासनाची व्यवस्था निश्चित केली आहे. परदेशातून माल येताना ज्यापासून देशास अत्यंत फायदा आहे व ज्यांचे बीज सहज मिळण्यासारखे नाहीत अशा वस्तू जकात न घेता येऊ द्यावे असे चाणक्याने सांगितले आहे. यातूनच त्याची दूरदृष्टी दिसते.

आजही अशा प्रकारच्या करनिती व व्यापारनितीचा अवलंब केला जातो. हीच बाब गृहीत धरून एका वेगळ्या दृष्टीकोनातून आजच्या वस्तू व सेवा कर प्रणालीचा विचार केला असता, आजची करपद्धती परदेशी गुंतवणूकदारांना सकारात्मक संदेश देणारी आहे. त्यांना भारतात उद्योग स्थापन करणे सोपे होईल. उत्पादकांचे कर ओझे कमी होईल, त्यांना दुहेरी कर द्यावा लागणार नाही. ही उत्पादने देशातील एकूण उत्पादन वाढविणारी ठरतील. त्यांचा उपभोग आपल्या देशातील नागरिकांना घेता येईल.

चाणक्य काळाप्रमाणे आजही कर हा सरकारच्या उत्पन्नाचे एक महत्त्वाचे साधन मानले जाते.

## सारांश :

आर्य चाणक्य यांनी तिसऱ्या-चौथ्या शतकांमध्ये मांडलेले करविषयक विचार आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही उपयुक्त ठरतात. कर व्यवस्थेचा पाया विस्तारून अधिकाधिक वस्तू व सेवा करकक्षेत आणताना न्यायाचाही विचार महत्त्वाचा ठरतो.

## संदर्भ :

### संदर्भ ग्रंथ :

१. इरेश स्वाती, चाणक्य नीतिसार, सुविद्या प्रकाशन, २००६.

२. कै.हिवरगांवकर ब.रा. यांनी केलेल्या मराठी भाषांतराचे पुनर्लेखनद्वारा भावे अ.ह., कौटिलीय अर्थशास्त्र (चौथे पुनर्मुद्रण २००२) मुद्रक व प्रकाशक भावे अ.ह., वरदा बुक्स पुणे, पान नं.१६३, २०२ ते २०५.

३. पाटील ज.फा., आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर (२००९), पान नं.२२८ ते २३२.

### मासिके :

१. अर्थसंवाद जुलै-ऑगस्ट २०१७, खंड ४१, अंक २, पान नं.९९

२. योजना नोव्हेंबर २०१६, अंक ४, पान नं.११, १४ ते १६.

### संकेत स्थळ :

1.http://sanskritebooks.worldpress.com/eboks.

LBP PUBLICATION